




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25






अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १३२ । किंमत - २ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । ०२/०६/२०२६ । पाने - ६


# दशरथ वर्पे यांनी व्रतस्थपणे आदिवासींची सेवा केली - थोरात

## सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात; 'सेवाव्रती' गौरवग्रंथाचे प्रकाशन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जयहिंद आश्रम शाळा, कोळवाडे येथील मुख्याध्यापक दशरथ वर्पे यांच्या सेवापूर्ती समारंभाला उपस्थित राहून त्यांचा सपत्नीक सन्मान करतांना मनस्वी आनंद झाला.

जयहिंद आदिवासी आश्रमशाळेच्या प्रगतीत दशरथ वर्पे यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या दूरदृष्टी, नियोजन कौशल्य आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शाळेला राज्यातील सर्वोत्कृष्ट आश्रमशाळेचा मान मिळाला.

मागील ३२ वर्षे त्यांनी व्रतस्थपणे आदिवासी विद्यार्थ्यांची सेवा केली. त्यामुळेच सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन, त्यांचा सन्मान केला हा त्यांनी आजवर केलेल्या कामाचा गौरव आहे असे मी समजतो. असे गौरवोद्गार राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले.

एस.एम.बी.टी. सेवाभावी ट्रस्ट संचलित जयहिंद आदिवासी आश्रमशाळा, कोळवाडे येथील मुख्याध्यापक दशरथ विठोबा वर्पे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा रविवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी दशरथ वर्पे सर व त्यांच्या सौभाग्यवती मंगलताई यांचा मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. शिक्षण, समाजसेवा आणि पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव माजी मंत्री बाळासाहेब थोरात व विविध मान्यवरांनी यावेळी केला.

यावेळी विधान परिषदेचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्यासह सौ. दुर्गाताई तांबे, उद्योजक मनिष मालपाणी, डॉ. जयश्री थोरात, के. के. थोरात, वडील विठोबा वर्पे, सुधाकर जोशी, शरद थोरात, अजय फटांगरे, फादर रॉबर्ट डिकोस्टा यांच्यासह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


गेली ३२ वर्षे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अविरत कार्य करणाऱ्या दशरथ वर्पे सर यांनी आपल्या कार्यकाळात जयहिंद आदिवासी आश्रमशाळेला राज्यपातळीवर विशेष ओळख मिळवून दिली. त्यांच्या दूरदृष्टी, नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या समर्पणामुळे शाळेला अनेक प्रतिष्ठेचे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले असून राज्यातील आदर्श आश्रमशाळांमध्ये शाळेचे नाव घेतले जाते.

शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन आपल्या लाडक्या गुरुजनांचा केलेला सन्मान. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी वर्पे सरांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या आठवणींना उजाळा देत कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणप्रेम रुजविण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

वर्पे सर हे केवळ शिक्षण क्षेत्रापुरते मर्यादित न राहता समाजकार्यातही सक्रिय राहिले. वृक्षसंवर्धन व पर्यावरण संरक्षणासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले. तसेच एस.एम.बी.टी. संस्थेच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना उपचार, वैद्यकीय मदत व विविध प्रकारचे सहकार्य उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपली. त्यामुळे शिक्षणतज्ज्ञ, समाजसेवक आणि वृक्षप्रेमी अशी त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली.

यावेळी वर्पे सरांच्या जीवनकार्याचा आढावा घेणाऱ्या दैनिक युवावार्ता संपादित 'सेवाव्रती' या गौरवग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या ग्रंथामध्ये त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि पर्यावरणीय कार्याचा सविस्तर लेखाजोखा मांडण्यात आला असून सहकारी, माजी विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या भावना व आठवणींचा समावेश करण्यात आला आहे. या गौरवग्रंथाचे संपादन दैनिक युवावार्ताचे संपादक किसन भाऊ हासे यांनी केले. तसेच ग्रंथनिर्मितीत विशेष योगदान दिल्याबद्दल संपादक किसन भाऊ हासे व कामगार सहकारी मुद्रणालय, संगमनेर येथील व्यवस्थापक शांताराम आडेप यांचा सन्मान करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना दशरथ वर्पे यांनी भावनिक शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. आदिवासी विद्यार्थ्यांची सेवा करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य आहे. विद्यार्थ्यांचे यश हेच माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे पारितोषिक आहे. आज माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि सहकाऱ्यांनी दिलेला सन्मान माझ्यासाठी अविस्मरणीय आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे आयोजन जयहिंद आदिवासी आश्रमशाळेचे माजी विद्यार्थी आणि समस्त ग्रामस्थ, कोळवाडे यांच्या वतीने करण्यात आले होते. संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी वर्पे सरांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.




# धर्म कार्यात राजकारण नको - महंत रामगिरी महाराज



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरालगतच्या जुन्या अकोले बायपास रोडवरील विठ्ठलनगर येथील विठ्ठल मंदिर आणि ह.भ.प. किसन महाराज हारदे आश्रमाच्या आवारात शनिवार (ता. ३० मे) रोजी आयोजित करण्यात आलेल्या गुरुवर्य माऊली महाराज समाधी भूमीपूजन कार्यक्रमावरून मोठा वाद निर्माण झाला होता. या कार्यक्रमाच्या विरोधात ह.भ.प. किसन महाराज हारदे शिष्य मंडळाने प्रशासनाला इशारा दिल्याने वातावरणात तणाव निर्माण झाला होता. या पार्श्वभुमिवर दोन गट पडलेल्या भक्तमंडळातील एका गटाने तीव्र विरोध, काळे झेंडे आणि निषेधाचे फलक, तर दुसरीकडे पोलिसांचा चोख बंदोबस्त अशा अत्यंत तणावपूर्ण वातावरणात समाधी मंदिराचा भूमिपूजन सोहळा पार पडला.

श्रीक्षेत्र सराला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी रामगिरी महाराजांनी या सोहळ्याला विरोध करणाऱ्यांचा खरपूस समाचार घेत त्यांच्यावर कडक शब्दांत टीका केली. ते म्हणाले, गुंजाळवाडी हद्दीतील श्री विठ्ठल मंदिर आणि ह.भ.प. किसनगिरी महाराज आश्रम हे संपूर्ण संगमनेर तालुका व पंचक्रोशीतील तमाम भक्तांचे श्रद्धास्थान आहे. हे मंदिर आणि आश्रम सर्व भक्तांच्या सहकार्याने व आर्थिक मदतीतून उभे राहिले आहे. त्यामुळे या धार्मिक कार्यात कुणीही अडथळा निर्माण करू नये. काळे झेंडे दाखविणारे काळ्या मनाचे आहेत असा टोला लगाववत या स्थळाचे सर्व कागदपत्रे सत्य कथन करीत आहेत. हे मंदिर जरी कुणाच्या ताब्यात असले तरी हे मंदिर सर्वांचे आहे असे सांगितले.

दरम्यान या प्रकरणी तालुक्यातील ग्रामस्थांच्यावतीने वारसा हक्काबाबत संगमनेर न्यायालयात आर.सी. एस. क्रमांक १६९/२०१५ अन्वये दावा दाखल करण्यात आला आहे.


(पान ६ वर)














# दुचाकी शोरुममध्ये ग्राहकांना मारहाण; बारा जणांवर गुन्हा



**बजाज शोरुम हे संगमनेर, अकोले तालुक्यातील नामांकित व विश्वसनीय दुचाकी शोरुम आहे. ग्राहक हे आमचे दैवत आहे. परंतु सदर घटनेतील फिर्यादी हे शोरुम मध्ये आल्यापासून प्रत्येकाशी अरेरावीने बोलत होते. मी व्यवस्थापक म्हणून त्यांची समजूत काढत असताना ते शुटींग काढू लागले. त्यांना शुटिंग काढू नका असे म्हटल्याने त्यांना राग आल्याने त्याने मला थेट ठोसा मारला. त्यामुळे कर्मचारी मदतीला धावून आले आणि हा प्रकार घडला. सदर इसमांची समजूत काढूनही त्यांनी आपला ताठरपणा कायम ठेवला. त्यामुळे आता आम्ही देखील कायदेशीर कारवाईचा विचार करू.**

**सचिन पलोड**
**व्यवस्थापक, बजाज शोरुम**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील मालपाणी बजाज शोमरुममध्ये शनिवारी (दि. ३०) सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास दुचाकी दुरुस्तीसाठी आलेल्या दोघा ग्राहकांना व्हिडिओ काढल्याचा राग आल्याने शोरुममधील पाच जणांसह इतर १० ते १२ कर्मचाऱ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला.

याबाबत स्वप्नील रोहिदास सातपुते (वय २५, रा. कासारा दुमाला) यांनी शहर पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की त्यांचे सासरे त्रिंबक लक्ष्मण राऊत (रा. जामगाव, ता. अकोले) यांनी त्यांच्या मुलाच्या नावावर चेतक दुचाकी (क्र.एमएच.१७, डीजी. ६०८४) घेतलेली आहे. ती बंद पडल्याने जामगाव येथून मालपाणी बजाज शोरुमध्ये दुरुस्त करण्यासाठी आणली होती. तेव्हा आम्हांला बाहेर लवकर जायचे असल्याने गाडी 'जमा करुन घ्या आणि पावती द्या असे म्हणाले. अर्ध्या तासाने पुन्हा गाडी जमा करुन घ्या

आणि पावती द्या असे म्हणाल्याने व्यवस्थापक सचिन पलोड हे मोठ्याने बोलू लागल्याने तुमचे असे बोलणे बरोबर नाही असे म्हणून सातपुते हे शूटिंग काढू लागले. याचा राग आल्याने व्यवस्थापक पलोड यांनी सातपुते व सासरे राऊत यांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की करु लागले. त्याचवेळी शोरुममधील इतर दहा ते पंधरा कर्मचारी तेथे आले व त्यांनीही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यातील दोन कर्मचाऱ्यांपैकी एकाने लोखंडी रॉडने व एकाने स्क्रू ड्रायव्हरने सातपुते यांना मारहाण केली. तर पलोड यांनी तुला मारुन टाकील' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. यावरुन पोलिसांनी सचिन पलोड, मंगेश मिसाळ, विष्णू मोहरीकर, सचिन धुमाळ, धारणकर (पूर्ण नाव व पत्ता ह माहीत नाही) यांच्यासह इतर १० ते १२ जणांवर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांवरुन गुन्हा दाखल केला आहे.

# सिन्नर-शिर्डी महामार्गावर भीषण अपघात

## निंभेरेतील दोन सख्ख्या भावांचा मृत्यू, १० जण जखमी

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - सिन्नर-शिर्डी महामार्गावर सावळीविहीर खुर्द परिसरात शनिवारी (३१ मे) दुपारी झालेल्या भीषण अपघातात राहुरी तालुक्यातील निंभेरे येथील दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला तर दहा जण जखमी झाले आहेत. या दुर्घटनेमुळे निंभेरे गावावर शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पनवेलहून शिर्डीकडे येणारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस (क्र. एमएच १४ एलएक्स ८९५१) दुपारी सुमारे दोन वाजता सावळीविहीर खुर्द परिसरातील ब्रांच चारीजवळ पोहोचली असता, शिर्डीकडून सिन्नरकडे जाणाऱ्या इर्टिगा कारने (क्र. एमएच १७ डीजे ७८१८) समोरासमोर जोरदार धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की बस रस्त्यापासून सुमारे शंभर फूट खाली जाऊन बंद अवस्थेतील एका रसवंती मशीनला धडकून थांबली. अपघातानंतर बसमधील प्रवाशांमध्ये एकच आरडाओरडा झाला. एका महिला प्रवाशाला धडकेच्या जोरात बसबाहेर फेकले गेले.

दरम्यान, इर्टिगा कारचा पुढील भाग पूर्णपणे चेंदामेंदा झाला. कारमधील प्रवासी विशाल काशिनाथ कांबळे, महेश काशिनाथ कांबळे, प्रांजल ससाणे, सोहम ससाणे आणि प्रियंका ससाणे हे गंभीर जखमी झाले. त्यापैकी राहुरी





तालुक्यातील निंभेरे येथील महेश काशिनाथ कांबळे आणि विशाल काशिनाथ कांबळे या सख्ख्या भावांना शिर्डीतील साईबाबा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

अपघातात आणखी दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्या पायांना गंभीर दुखापत झाल्याने पुढील उपचारासाठी त्यांना अहिल्यानगर येथे हलविण्यात आले आहे. तसेच नागम्मा, कविता, ललिता, लक्ष्मी, अतर्क्य, ललिता गुंभनवार आणि श्रद्धा निते यांच्यासह अन्य जखमींवर साईबाबा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच शिर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश येसेकर, पोलीस कॉन्स्टेबल प्रसाद इंगळे व त्यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य राबविले. जखमींना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले. या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच राहुरी मतदारसंघाचे आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी कांबळे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले व दुःखात सहभागी होत आवश्यक मदतीचे आश्वासन दिले. या भीषण अपघातामुळे संपूर्ण निंभेरे गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# आजपासून एसटीची स्वच्छतागृहे मोफत

## बसस्थानके चकाचक आणि प्रवासही होणार सुखकर

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या ७८व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आज, १ जूनपासून विशेष स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ करण्यात येत असून, त्याअंतर्गत यंदा ७८ हजार रोपांची लागवड केली जाणार आहे. तसेच प्रवाशांना एसटीच्या सर्व स्वच्छतागृहांचा मोफत वापर करता येणार आहे. मात्र या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर महामंडळाने आधीच, म्हणजेच १५ एप्रिलपासून प्रवाशांच्या प्रत्येक तिकिटावर दोन रुपयांचा अधिभार लागू केलेला आहे.

अधिकचे भाडेवाढ करूनही एसटी बसस्थानक तसेच आगारातील स्वच्छतागृहे स्वच्छ नसल्याच्या अनेक तक्रारी प्रवाशांकडून येत होत्या. इतकेच



नव्हे तर स्थानक-आगार परिसरातील अस्वच्छता आणि पाणपोईंची दुरवस्था पाहायला मिळते. यामुळे प्रवाशांनी एसटीकडे नाक मुरडण्यास सुरुवात केली होती. याच पार्श्वभूमीवर प्रवासी सुविधा वाढवण्यासाठी महामंडळाकडून स्वच्छता मोहीम राबवण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत स्थानक आणि आगार परिसराची दर चार तासांनी स्वच्छता, पाणपोई सुरू करणे तसेच चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांमध्ये अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दोन महिन्यांपूर्वी केलेल्या घोषणेनुसार, स्वच्छतागृहांच्या देखभालीसाठी असलेली खासगी कंत्राटदारी व्यवस्था आता बंद करण्यात आली आहे. पूर्वी कंत्राटदारांकडे जबाबदारी असूनही अस्वच्छतेच्या तक्रारी कायम येत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून, आता स्वच्छतागृहांची देखभाल आणि सर्व सुविधा पुरवण्याची जबाबदारी पूर्णपणे एसटी महामंडळाने स्वतःकडे घेतल्यामुळे राज्यातील सर्व आगारांमध्ये प्रवाशांना एकसमान आणि उत्तम सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# मेंढपाळाच्या लेकीची मुंबई पोलिसांत भरारी

निसर्गाचा लहरीपणा, डोक्यावर बँकेच्या कर्जाचा सात-आठ लाखांचा डोंगर आणि त्यातच अचानक बुडालेला व्यवसाय अशा लागोपाठच्या संकटांनी एखाद्या सर्वसामान्य कुटुंबाचा कणा मोडून पडला असता. पण, जिद्द आणि कठोर मेहनतीच्या जोरावर या परिस्थितीची कोंडी फोडत संगमनेरच्या पठारभागातील एका दुर्गम बागलवाडीच्या कन्येने थेट मुंबई पोलीस दलाला गवसणी घातली आहे. नूतन चंद्रकांत पवार असे या रणरागिणीचे नाव आहे.

नांदूर खंदरमाळ परिसरातील बागलबोडी हे डोंगराळ आणि दुर्गम गाव. येथील सुरेखा आणि चंद्रकांत पवार हे कष्टकरी दाम्पत्य. कोरडवाहू शेती बेभरोशाची असल्याने नूतनच्या वडिलांनी आधी मोलमजुरी केली, पाईपलाईनची कामे केली. कुटुंबाला हस्तभार लागावा म्हणून बँकेकडून ७ ते ८ लाखांचे कर्ज काढून राजस्थानी शेळ्या आणल्या. पण नशिबाचा खेळ बघा, आजारपणामुळे सर्व शेळ्या दगावल्या आणि होत्याचे नव्हते झाले. कर्ज कसं फेडायचं हा प्रश्न समोर असताना त्यांनी हार मानली नाही. त्यांनी तत्काळ मेंढीपालनाचा जोडधंदा सुरू केला आणि मुलीच्या स्वप्नांना कधी अटकाव केला नाही.

नूतनचे दहावीपर्यंतचे शिक्षण गावातच झाले, तर बारावी नाशिकला. खाकी वर्दीचे स्वप्न उराशी बाळगून ती संगमनेरच्या ज्ञानगंगा करिअर अकॅडेमीमध्ये दाखल झाली. पहिले वर्ष अपयशाचे ठरले, अवघ्या काही गुणांनी वर्दी हुकली. पण नूतन खचली होती, मेंढ्यांच्या मागे फिरणाऱ्या बापाने मुलीच्या पाठीवर हात ठेवला आणि म्हणाला, बाळा, तू घाबरू नको कधीतरी यश नक्की येईल, तू प्रयत्न चालू ठेव ! बापाच्या या शब्दांनी नूतनला बळ दिले. रोज सकाळी मैदानी सराव, दिवसभर तासिका आणि रात्री १२-१२ वाजेपर्यंत अभ्यास. अखेर दोन वर्षांच्या या तपस्येला फळ आले आणि नूतनची मुंबई पोलीस दलात दिमाखात निवड झाली. याबद्दल घारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी नूतनचा विशेष सत्कार केला. सध्या संपूर्ण परिसरातून नूतनवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



संगमनेर - कत्याच झालेल्या शिक्षण प्रसारक संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत संस्थेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल डॉ. आशुतोष नारायण माळी आणि संचालकपदी भरघोस मताने विजयी झाल्याबद्दल डॉ. पराग प्रकाश सराफ यांचा सत्कार संगमनेर पुरोहित संघ अर्थात पुरोहित प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ जाखडी, उपाध्यक्ष संदीप वैद्य, राजाभाऊ क्षीरसागर, बाळकृष्ण जोशी, राहुल कुलकर्णी, अनिल शेटे, आदित्य कुलकर्णी, प्रतीक जोशी पवन काळे, उमेश जोशी, सागर मुळे, शंतनु जाखडी डॉ. प्रफुल्ल सोमण, विशाल जाखडी आदी मान्यवर उपस्थित होते.

# पेट्रोल-डिझेलनंतर गॅसचा पुन्हा भडका



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पेट्रोल-डिझलेच्या दरवाढीनंतर आता एलपीजी सिलेंडरच्या किमतीत मोठी वाढ करण्यात आली आहे. आजपासून (१ जून २०२६) देशभरातील व्यावसायिक आणि छोट्या व्यापाऱ्यांना आणखी एक मोठा आर्थिक फटका बसला आहे. तेल कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमतीत पुन्हा एकदा वाढ केली आहे. या नव्या दरवाढीमुळे रेस्टॉरंट्स, हॉटेल्स, केटरर्स आणि हजारो लहान व्यावसायिकांचे बजेट पूर्णपणे कोलमडणार आहे. परिणामी सर्वसामान्य ग्राहकांना बाहेर जेवणासाठी जास्त पैसे मोजावे लागणार आहे. सुदैवाने, घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात कोणताही बदल झालेला नाही.या ताज्या दरवाढीनंतर दिल्लीत १९ किलोच्या व्यावसायिक सिलेंडरच्या किमतीत ४२ रुपयांची वाढ झाली असून, तो आता ३,११३.५० रुपयांना मिळणार आहे. तर कोलकात्यात सर्वाधिक म्हणजेच ५३.५० रुपयांची वाढ झाल्याने तिथला दर ३,२५५.५० रुपयांवर पोहोचला आहे.केवळ मोठे सिलेंडरच नव्हे, तर ५ किलोच्या फ्री ट्रेड एलपीजी सिलेंडरच्या किमतीतही ११ रुपयांची वाढ झाली आहे. दिल्लीत आता हा छोटा सिलेंडर ८२१.५० ला मिळेल. याचा फटका विद्यार्थी आणि बाहेर राहणाऱ्या नोकरदारवर्गाला बसणार आहे.चालू वर्षाच्या सुरुवातीचा विचार केला, तर व्यावसायिक गॅसच्या किमतीने व्यावसायिक आणि सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. जानेवारीमध्ये दिल्लीत ज्या सिलेंडरची किंमत १,६९१.५० रुपये होती, ती अवघ्या पाच महिन्यांत तब्बल १४०० रुपयांपेक्षा जास्त वाढली आहे.

# प्लास्टिकच्या डब्यांचा वाढता वापर आरोग्यासाठी धोकादायक




आजच्या धावपळीच्या जीवनात प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. स्वस्त, हलक्या आणि सहज उपलब्ध असल्यामुळे घराघरांत प्लास्टिकचे डबे, बाटल्या, प्लेट्स, ग्लास, चमचे, टिफीन आणि पिशव्या मोठ्या प्रमाणात वापरल्या जातात. विशेषतः अन्न साठवण्यासाठी आणि मुलांच्या डब्यासाठी प्लास्टिकच्या कंटेनरचा वापर सामान्य झाला आहे. मात्र, याच प्लास्टिकमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात, असा इशारा तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

अनेक जण गरम पदार्थ थेट प्लास्टिकच्या डब्यांमध्ये ठेवतात किंवा मायक्रोवेव्हमध्ये प्लास्टिकचे कंटेनर वापरतात. पण उष्णतेमुळे प्लास्टिकमधील घातक रसायने अन्नामध्ये मिसळण्याची शक्यता वाढते. विशेषतः बीपीए आणि फ्थॅलेट्ससारखी रसायने शरीरातील हार्मोन्सवर परिणाम करतात. यामुळे दीर्घकाळात विविध आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. तेलकट, गरम किंवा आम्लयुक्त पदार्थ प्लास्टिकमध्ये ठेवणे अधिक धोकादायक मानले जाते.

फ्रीजमध्ये अन्न साठवताना किंवा मुलांना शाळेत डबा देताना प्लास्टिकचा वापर सहज केला जातो. मात्र, वारंवार वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तू कालांतराने खराब होतात आणि त्यातील रासायनिक घटक अन्नात मिसळू शकतात. त्यामुळे अशा वस्तूंचा वापर मर्यादित ठेवणे आवश्यक आहे.

तज्ज्ञांच्या मते, प्लास्टिकऐवजी काचेचे डबे, स्टेनलेस स्टीलची भांडी, सिलिकॉन किंवा बांबूपासून तयार केलेले कंटेनर वापरणे अधिक सुरक्षित ठरते. बाजारातून प्लास्टिकचे डबे घेताना 'फूड ग्रेड' किंवा 'बीपीए फ्री' अशी खात्री करूनच खरेदी करावी. तसेच प्लास्टिकच्या डब्यात गरम अन्न ठेवणे किंवा त्यात अन्न गरम करणे टाळावे.

आरोग्याची काळजी घेण्यासाठी दैनंदिन जीवनातील छोट्या सवयी बदलणे गरजेचे आहे. प्लास्टिकचा अतिरेक टाळून सुरक्षित पर्याय स्वीकारल्यास अनेक आरोग्यधोके टाळता येऊ शकतात.



# डॉ. हसमुख जैन यांना ब्रेकथ्रू रिसर्च इव्हॉन पुरस्कार प्रदान

युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर - मुंबई येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये प्राध्यापक व कॅन्सरतज्ञ म्हणून कार्यरत असलेले व उच्च दर्जाच्या, माफक आणि व्यापक स्तरावर उपलब्ध होऊ शकणाऱ्या कॅन्सर उपचार पद्धतीचे संशोधन करून विकसित करण्यासाठी मोठी योगदान दिल्याबद्दल डॉ. हसमुख जैन यांना ब्रेकथ्रू रिसर्च इव्हॉन हा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

शिकागो येथील पार्क वेस्टमध्ये इव्हॉन पुरस्कार सोहळ्यात कॅन्सरतज्ञ डॉक्टर हसमुख जैन यांना ब्रेकथ्रू रिसर्च इव्हॉन पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. हसमुख जैन यांनी कॅन्सर सारख्या अत्यंत दुर्धर आजारावर नवीन संशोधन करून सर्वसामान्यांना सहज उपलब्ध होईल अशा थेरेपी विकसित केल्या आहेत. हा सन्मान रक्तविकारांवरील कर्करोग (हेमॅटोलॉजिक ऑन्कोलॉजी), सेल थेरपी, क्लिनिकल संशोधन, वैद्यकीय प्रशिक्षण आणि भारतातील सर्वसामान्य रुग्णांसाठी परवडणाऱ्या कर्करोग उपचारांच्या क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल देण्यात आला आहे.

डॉ. जैन यांनी बंगळुरूच्या केम्पेगौडा इन्स्टिटट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमधून एमबीबीएस, मंगळुरूच्या कस्तुरबा मेडिकल कॉलेजमधून एमडी (मेडिसिन) आणि २०१३ मध्ये मुंबईच्या टाटा मेमोरियल सेंटरमधून डीएम (मेडिकल ऑन्कोलॉजी) पदवी प्राप्त केली. २०१३ मध्ये त्यांनी टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून रुजू होत रक्तविकारांशी संबंधित कर्करोगांवर विशेष काम सुरू केले. २०१५ मध्ये ते सहयोगी प्राध्यापक तर २०२० मध्ये प्राध्यापक झाले.

डॉ. जैन यांच्या कारकीर्दीतील सर्वात महत्त्वपूर्ण काम म्हणजे भारतातील पहिल्या स्वदेशी सीएआर-टी सेल थेरपीच्या विकासाचे नेतृत्व. 'नेक्सकार-१९' या उपचारपद्धतीचा वापर बी-सेल कर्करोगांवरील पुनरावृत्ती किंवा उपचारांना प्रतिसाद न देणाऱ्या रुग्णांसाठी करण्यात आला. ही योजना आयआयटी बॉम्बे आणि अमेरिकेच्या नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने राबविण्यात आली. क्लिनिकल चाचणी सुरू झाल्यानंतर अवघ्या २४ महिन्यांत या उपचाराला



नियामक मान्यता मिळाली.

नवकल्पनांना व्यापक स्वरूप देण्याचे कार्य नवीन उपचार विकसित करणे पुरेसे नसते, ते रुग्णांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणेही तितकेच महत्त्वाचे असते. यासाठी डॉ. जैन यांनी देश-विदेशातील डॉक्टर, परिचारिका आणि विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले. तसेच रुग्ण निवड, दुष्परिणाम व्यवस्थापन आणि बाह्यरुग्ण उपचारासाठी आवश्यक कार्यपद्धती विकसित केल्या.

CD19 CAR-T च्या यशानंतर डॉ. जैन आता BCMA CAR-T या नव्या उपचारपद्धतीच्या संशोधनाचे नेतृत्व करत आहेत. सुरुवातीच्या चाचण्यांमध्ये या उपचाराने आशादायक परिणाम दाखवले आहेत. ग्रामीण भागातील कर्करोग उपचार व्यवस्था मजबूत डॉ. जैन यांनी ग्रामीण आणि दुर्लक्षित भागांमध्ये कर्करोग उपचार सुविधा उभारण्यासाठीही योगदान दिले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे एका ग्रामीण रुग्णालयात ऑन्कोलॉजी विभाग, प्रतिबंधात्मक कर्करोग कार्यक्रम, बहुविद्याशाखीय ट्युमर बोर्ड आणि बोन मॅरो प्रत्यारोपण सुविधा सुरू करण्यात आल्या.

२०१३ ते २०२३ या कालावधीत त्यांनी टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये मेडिकल ऑन्कोलॉजी फेलोशिपच्या विद्यार्थ्यांसाठी रक्तविकारांवरील कर्करोग प्रशिक्षण कार्यक्रमाचे नेतृत्व केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनासाठी विशेष शैक्षणिक प्रणालीही विकसित केली.

डॉ. जैन यांनी टाटा मेमोरियल सेंटरमध्ये सेल थेरपी विभाग उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतातील सर्वात मोठा सेल थेरपी कार्यक्रम विकसित झाला असून २०० हून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. संशोधन आणि प्रकाशन क्षेत्रातील योगदान डॉ. जैन यांनी प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये ८५ हून अधिक संशोधन लेख प्रकाशित केले आहेत. ते सध्या भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद नॅशनल कॅन्सर ग्रिड आणि लेडी टाटा मेमोरियल ट्रस्ट यांच्या मदतीने चालणाऱ्या १५ संशोधन प्रकल्पांचे प्रमुख संशोधक आहेत.

राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांच्या निर्मितीत सहभाग ते हेमॅटॉलॉजी कॅन्सर कन्सोर्टियमच्या ल्युकेमिया वर्किंग ग्रुपचे सह-अध्यक्ष आहेत. तसेच नॅशनल कॅन्सर ग्रिडच्या रक्तविकारांवरील कर्करोग उपचार मार्गदर्शक तत्त्वांचे समन्वयक म्हणूनही कार्यरत आहेत.



संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०



We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५




# जिल्ह्यात 3 जूनपर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाचा 'येलो अलर्ट'



जिल्हा माहिती कार्यालय -

अहिल्यानगर- भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात ३१ मे ते ३ जून या कालावधीत तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस व सोसाटच्याच्या वाऱ्याची शक्यता असल्याने जिल्ह्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य नुकसान टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी गिते यांनी केले आहे.

मेघगर्जना होत असताना, विजा चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना नागरिकांनी झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबू नये. सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. तसेच टॉवर्स, ध्वजांचे खांब, विजेचे खांब, धातूचे कुंपण, रोहित्र व लोंबकळणाऱ्या केबल्सपासून दूर राहावे. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा व कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. घराबाहेर मोकळ्या जागेत असताना वीज चमकल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने कान झाकावेत व डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये ठेवून जमिनीशी कमीत कमी संपर्क ठेवावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल तसेच जाहिरात फलक कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी त्यांच्या आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वादळी वारा, पाऊस व गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळीच नियोजन करून आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीत विक्रीसाठी आणलेल्या वा नियोजित केलेल्या मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. धरण व नदी क्षेत्रात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घेऊन धरणाच्या पाण्यात, नदीच्या वा कालव्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये व धोकादायक ठिकाणी स्वतःचे छायाचित्र काढू नये. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे पालन करावे. मदतीसाठी नजीकचे पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय येथील ०२४१-२३२३८४४, ०२४१-२३५६९४० या दूरध्वनी क्रमांकांवर किंवा ११२, १०७७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना मुख्यमंत्री फडणवीस यांचेकडून अभिवादन



जिल्हा माहिती कार्यालय -

अहिल्यानगर- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी (ता.जामखेड) येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास भेट देऊन अभिवादन केले. यावेळी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही अभिवादन केले.

याप्रसंगी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक येथे जाऊन दर्शन घेतले.

# अखंड शुद्धतेची विश्वसनीय परंपरा एस. आर. थोरात मिल्क

SR THORAT DAIRY

दुध केवळ एक अन्नपदार्थ नसून प्रत्येक कुटुंबाच्या आरोग्याशी, विश्वासाशी आणि दैनंदिन जीवनाशी जोडलेले एक महत्त्वपूर्ण माध्यम आहे. त्यामुळे ग्राहक आज केवळ दूध विकत घेत नाहीत, तर त्यामागील गुणवत्ता, सुरक्षितता आणि विश्वासही निवडतात. याच विचारातून उभी राहिलेली एस. आर. थोरात मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि. (थोरात डेअरी) ही संस्था गेली तीन दशकांहून अधिक काळ ग्राहकांना शुद्ध, सुरक्षित आणि दर्जेदार दृग्ध उत्पादने उपलब्ध करून देत आहे. या संस्थेचा पाया दूरदृष्टी प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेप्रती असलेल्या कटिबद्धतेवर उभारला गेला. दिवंगत संस्थापक संभाजीराजे थोरात यांनी ग्राहकांपर्यंत सर्वोत्तम दर्जाचे आणि पोषक दूध पोहोचवण्याचे ध्येय ठेवून या प्रवासाची सुरुवात केली. त्यांनी केवळ व्यवसाय उभारला नाही, तर शेतकरी, ग्राहक आणि गुणवत्ता यांना केंद्रस्थानी ठेवणारी कार्यसंस्कृती निर्माण केली. आजही त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा वारसा संस्थेच्या प्रत्येक

टप्प्यात दिसून येतो. आज अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आबासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संस्था आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्ता व्यवस्थापन आणि ग्राहक समाधान यांना केंद्रस्थानी ठेवून सातत्याने प्रगती करत आहे. प्रादेशिक स्तरावर मजबूत उपस्थिती निर्माण केल्यानंतर आता संपूर्ण भारतभर आपली विश्वासार्ह ओळख अधिक व्यापक करण्यासाठी संस्था कार्यरत आहे. एस. आर. थोरात मिल्क प्रॉडक्ट्सची खरी ताकद म्हणजे तिची सुसंगत आणि काटेकोर उत्पादन प्रक्रिया. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून संकलित होणारे दूध आधुनिक चिलिंग सेंटर्स आणि बल्क मिल्क कूलिंग सेंटर्समध्ये गुणवत्ता तपासणीनंतर पुढील प्रक्रियेसाठी पाठवले जाते. शुद्धता, पोषणमूल्य, सुरक्षितता आणि दर्जा यांची प्रत्येक स्तरावर तपासणी केली जाते. त्यानंतर इन्सुलेटेड वाहतुकीद्वारे दूध अत्याधुनिक प्रक्रियाकेंद्रात पोहोचते, जिथे वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया, स्वच्छ पॅकिंग आणि नियंत्रित साठवण करून ग्राहकांपर्यंत पोहोचवले जाते. ही संपूर्ण साखळी शेतकऱ्यापासून ग्राहकापर्यंत. विश्वास जपण्याचे काम करते.

ग्राहकांच्या बदलत्या गरजा आणि जीवनशैली लक्षात घेऊन संस्थेने ॲक्टिव्ह, प्राईम, सिल्क आणि टी-टॉप अशा विविध दूध श्रेणी विकसित केल्या आहेत. या उत्पादनांमधून प्रत्येक ग्राहकाला त्याच्या गरजेनुसार दर्जेदार पर्याय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो. दुधासोबतच संस्थेने दुग्धजन्य उत्पादनांच्या क्षेत्रातही उल्लेखनीय विस्तार साधला आहे. गगनगिरी या ब्रँडअंतर्गत संस्थेने गुणवत्ता, पारंपरिक चव आणि आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान यांचा सुंदरमिलाफ घडवून आणला आहे. स्थानिक शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या ताज्य दुधावर आधारित उत्पादन प्रक्रियेमुळे गगनगिरीने ग्राहकांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे.

# अमृतसागर दूध संघ : सहकारातून ग्रामीण समृद्धीचा यशस्वी प्रवास

## जागतिक दुध दिनानिमित्ताने...

अमृतसागर सहकारी दूध व्यवसायिक व प्रक्रिया संघ मर्या. जय सहकार ! अकोले, जि. अहमदनगर अगस्ती दूध

अकोले तालुक्यातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी आणि ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाला सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेला अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले हा आज सहकार क्षेत्रातील एक आदर्श संस्थात्मक उपक्रम म्हणून ओळखला जात आहे. शेतकरी हिताला केंद्रस्थानी ठेवून सुरू झालेल्या या संस्थेने गेल्या अनेक वर्षांत दूध उत्पादकांचा विश्वास संपादन करत ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण अर्थकारणाचा कणा मानला जातो. अशा परिस्थितीत दूध उत्पादकांना योग्य दर, वेळेवर देयके आणि स्थिर बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे काम अमृतसागर दूध संघाने सातत्याने केले आहे. संस्थेच्या माध्यमातून हजारो लिटर दूध संकलित केले जाते आणि त्याची प्रक्रिया करून उत्पादकांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यात येते. विशेष म्हणजे, प्रत्येक वेळी शेतकऱ्यांचे दूध बिल वेळेत अदा करण्याची परंपरा संस्थेने जपली असून त्यामुळे उत्पादकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाला संघटित स्वरूप देत शेतकऱ्यांना सहकार्य, विश्वास आणि सुरक्षिततेचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे संस्थेचे प्रमुख ध्येय राहिले आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीत आणि वाढत्या स्पर्धेच्या युगातही शेतकरी हिताचे रक्षण करत सहकारी चळवळीला बळकटी देण्याचे कार्य संघाने प्रभावीपणे केले आहे.

संस्थेच्या यशस्वी वाटचालीमध्ये चेअरमन तथा माजी आमदार वैभवराव पिचड, व्हाईस चेअरमन रावसाहेब वाकचौरे तसेच सर्व संचालक मंडळाचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली संस्थेने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात ब्राम्हणवाडा येथील शासकीय दूध योजनेच्या प्लांटची जागा संघाच्या नावावर करून घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. तसेच केंद्र सरकारच्या दुग्धजन्य पदार्थ निर्मिती प्रकल्पाच्या माध्यमातून संस्थेच्या विस्ताराला नवी दिशा मिळाली आहे.

दुग्ध व्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, प्रक्रिया क्षमतेत वाढ, गुणवत्तापूर्ण उत्पादनांवर भर आणि उत्पादकांशी विश्वासाचे दृढ नाते निर्माण करण्यासाठी संघ सातत्याने प्रयत्नशील आहे. यामुळे केवळ दूध संकलनच नव्हे तर मूल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थ निर्मितीच्या दिशेनेही संस्थेची वाटचाल सुरू आहे.

संस्थेचे कार्यकारी संचालक *दादाभाऊ सावंत* यांच्या सुयोग्य व्यवस्थापनामुळे संघाच्या दैनंदिन कामकाजात कार्यक्षमता आणि पारदर्शकता टिकून राहिली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने आधुनिक व्यवस्थापन तत्त्वांचा अवलंब करत शेतकरी हिताचे निर्णय प्रभावीपणे राबविले आहेत.

अकोले तालुक्यातील पशुपालक आणि दूध उत्पादकांसाठी अमृतसागर दूध संघ ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून विश्वास, सहकार्य आणि स्वावलंबनाचे प्रतीक बनली आहे. ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती, पशुपालन व्यवसायाला चालना आणि स्थानिक अर्थचक्र गतिमान ठेवण्यात संघाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे.

आज सहकार, आधुनिक व्यवस्थापन आणि शेतकरी सहभाग यांचा सुंदर समन्वय साधत अमृतसागर दूध संघ ग्रामीण विकासाचा एक सक्षम आणि विश्वासार्ह आधारस्तंभ म्हणून पुढे जात आहे. भविष्यातही शेतकरी हित, गुणवत्ता आणि विकास यांना प्राधान्य देत ही संस्था ग्रामीण समृद्धीच्या नव्या उंची गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# संगमनेर तालुक्याला हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

तळेगाव दिघे -चिंचोली गुरव येथे झालेल्या पाणी परिषदेतून निळवंडे धरण सुरू झाले या धरणासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. अनेकांनी अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र तरीही धरण आणि दोन्ही कालवे आपण पूर्ण केले. आता पाणी आले आहे. उर्वरित भागालाही पाणी द्यायचे आहे. मात्र काँक्रिटीकरण करून पाणी पुढे नेले जात असून संगमनेर तालुक्याला आपल्या हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे अशी आग्रही मागणी निळवंडे धरण व कालव्याचे निर्माते माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

तळेगाव दिघे येथील महाराजा लॉन्स येथे सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने आयोजित ऊस विकास मेळावा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले, व्हीएसआयचे शास्त्रज्ञ डॉ अशोक जगताप, डॉ समाधान सुरवसे, डॉ. जयश्रीताई थोरात, रामहरी कातोरे, प्रभाकर कांदळकर, संचालक संपतराव गोडगे, हौशीराम सोनवणे, अविनाश सोनवणे, बी आर चकोर, भारत मुंगसे, बाबासाहेब कांदळकर, संचालक रामनाथ कुटे, योगेश भालेराव, नवनाथ आरगडे, विजय राहणे, गुलाबराव देशमुख, अरुण वाकचौरे, मदन आंबरे, डॉ तुषार दिघे, विलास शिंदे, दिलीप नागरे, नामदेव दादा दिघे, सरपंच विलास सोनवणे, राजेंद्र कहांडळ, राजेंद्र मुंगसे, संभाजीराव वाकचौरे कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, म्हाळादेवी धरण झाले असते तर पाण्याची लेव्हल वर आली नसती. आणि नदीच्या कडेलाच पाण्याचा फायदा झाला असता. मात्र चिंचोली गुरव येथे पाणी परिषद झाली आणि निळवंडे धरणासाठी आपण पाठपुरावा सुरू केला. एक दिवसही विश्रांती न घेता धरण आणि कालवे पूर्ण दिले. ज्यांनी अडचणी निर्माण केल्या त्यात श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहे. कालव्याला अस्तरीकरण केले जात असून पाणी पुढे नेले जात आहे. ते ही शेतकरी आमचेच आहे मात्र संगमनेर तालुक्याला हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे.

पाणी विज या राजकारणापलीकडच्या गोष्टी आहेत. याबाबत नवीन लोकप्रतिनिधी काहीही बोलत नाही. हे दुर्दैवी आहे त्यांचे लक्ष दुसरीकडेच आहे. निमोण, नान्नज दुमाला ,पारेगाव खुर्द ,पारेगाव बुद्रुक ,तळेगाव ,सोनोशी , काकडवाडी, पिंपळे,करुले या गावांसाठी उपसा सिंचन योजना आपण मंजूर करून ठेवल्या होत्या. मात्र नव्या सत्ताधाऱ्यांनी या योजना रद्द केल्या आहेत. भोजापूर चारी आपण पूर्ण केली. पाणी आणण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. भोजपूर चारीवरून ज्यांनी या भागात विष कालविण्याचा प्रयत्न केला ते आता पाणी प्रश्नावर गप्प आहे. त्यांना आता सर्वांनी जाब विचारला पाहिजे.

निळवंडे चे पाणी पुढे नेले जात आहे .वीज मिळत नाही. पिक विमा मिळत नाही अशावेळी नवीन लोकप्रतिनिधी मात्र पूर्ण गप्प आहे. म्हणून आपल्याला सर्वांना जागृत व्हावे लागेल मतभेद विसरून पाण्यासाठी एकत्र या. निळवंडे धरण व कालव्यांप्रमाणे काकडी विमानतळ आपण पूर्ण केले. रेल्वे मंजूर करून घेतली .तालुक्यात रेल्वे करता ५६० कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले. त्यावेळी जी एम आर टी चे कोणतेही कारण नव्हते .आपण सत्तेत नाही आणि आता हे कारण पुढे काढून रेल्वे पळवण्याचा घाट घातला जात आहे. संगमनेर तालुक्याचा विकास ज्यांना पहावत नाही त्यांनी रेल्वे बाबत राजकारण केले आहे.

याचबरोबर यावर्षी कमी पाऊस असल्याबाबत चिंता व्यक्त करताना हक्काचे पाणी मिळाले पाहिजे. ते पाणी जपून वापरावे. तसेच दूध व ऊस हे शाश्वत पिक आहे .या भागात जास्तीत जास्त ऊस लागवड करताना शेतकऱ्यांनी एकरी शंभर एकर उत्पादन घ्यावे असे आवाहन केले. याचबरोबर चेन्नई सुरत ग्रीनफिल्ड महामार्ग या भागातून जात असून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला मिळावा याकरता आपण शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत याबाबत आपण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी बोललो असून त्यांनीही शेतकऱ्यांना मदतीबाबत सकारात्मकता दर्शवली असल्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे

# तळेगाव दिघे शाळेचे मुख्याध्यापक अशोक गडाख सेवानिवृत्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

तळेगाव दिघे - संगमनेर तालुक्यातील सर्वात मोठी समजली जाणारी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा तळेगाव दिघे येथील मुख्याध्यापक अशोक गडाख हे मे २०२६ अखेर ३४ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.

दि. २२ ऑगस्ट २०२४ रोजी त्यांनी या शाळेच्या मुख्याध्यापकपदाची सूत्रे स्वीकारली. अल्प कालावधीत त्यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करत शाळेला एका नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला. शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, विद्यार्थी विकास आणि भौतिक सुविधा यावर विशेष भर देत अनेक अभिनव उपक्रम राबविले. त्यांच्या कार्यकाळात शाळेत मानवी साखळी, संगीत कवायत, विद्यार्थी वाढदिवस उपक्रम, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, वृक्षांसाठी कुंड्यांची व्यवस्था, इंटरक्टिव्ह बोर्ड, सीसीटीव्ही कॅमेरे, शालेय बांधकाम व दुरुस्ती, विद्यार्थ्यांसाठी खेळणी, स्वच्छतागृह दुरुस्ती आदी महत्त्वाची कामे करण्यात आली.

शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी त्यांनी मिशन आरंभ, जादा तासिका, मंथन परीक्षा नियोजन, प्रज्ञाशोध परीक्षा, राज्यस्तरीय लक्षवेध परीक्षा यांसारख्या उपक्रमांचे प्रभावी नियोजन केले. तसेच स्नेहसंमेलन, शैक्षणिक सहली, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत शाळेचा समावेश, सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रीडा स्पर्धांमधील जिल्हास्तरीय यश यांमुळे शाळेची ओळख अधिक दृढ झाली. या यशस्वी वाटचालीत शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीमती अश्विनी अमोल दिघे, माजी अध्यक्षा श्रीमती पूनम जोर्वेकर, भाऊसाहेब दिघे, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य तसेच माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री गणेश दिघे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

तसेच शिक्षकवृंदामध्ये ज्ञानदेव उकिर्डे, श्रीमती उषा म्हसे, संतोष दळे, शर्मिला शिंदे, श्रीमती प्रमोदिनी साळुंखे, योगेश नवले, दीपक क्षीरसागर, उज्वला शिंदे, सविता राहणे, भाग्यश्री बडदे, स्मिता गायकवाड, संदीप पोखरकर, मनोहर यादव, नंदा नवाळी, वैशाली घुले, जमिला शेख व श्री काळू भांगरे यांची अनमोल साथ त्यांना लाभली. मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना अशोक गडाख यांनी विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, शाळेचा सर्वांगीण विकास आणि समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून शाळेच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी नागरिकांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या असून त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

# संपादकीय...

## विषारी दारूचे बळी

पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात विषारी दारू प्यायल्याने गेल्या तीन दिवसात २३ जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने राज्यभर खळबळ माजली आहे. विषारी दारूच्या या मृत्यकांडाने सर्वसामान्य नागरिकांनाच नाही तर सरकारलाही धक्का बसला आहे म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले असून या दारूकांडला जबाबदार असणाऱ्या काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई देखील केली आहे. अर्थात सरकारने केलेली ही कारवाई योग्यच आहे असे म्हणावे लागेल कारण संबंधित अधिकाऱ्यांनी जर आपले कर्तव्य चोख बजावले असते तर हे २३ जीव वाचले असते. आता या दारुकांडाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कारवाई होईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. या विषारी दारूकांडाने सपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली असली तरी विषारी दारू पिऊन मृत्यूकांड घडल्याची ही देशातील पहिली घटना नाही याआधी अशा अनेक घटना घडल्या असून त्यात अनेकांचा जीव गेला आहे. दरवर्षी देशात कोठेना कोठे अशा घटना घडतच असतात. मागील वर्षी बिहारमध्ये अशी घटना घडली होती आणि त्यात ७ जणांचा मृत्यू झाला होता. त्याआधी ऑक्टोबर २०२४ मध्ये बिहारमध्येच ४० जणांचा विषारी दारूने बळी घेतला होता. २०२२ साली तर बिहारमधील छपरा जिल्ह्यात ७३ जणांना विषारी दारूने जीव गमवावा लागला होता. बिहारमधीलच गोपालगंज येथे २०१६ साली १६ लोक विषारी दारूचे बळी ठरले होते. विशेष म्हणजे बिहारमध्ये संपूर्ण दारू बंदी आहे असे असतानाही तिथे खुलेआम दारूविक्री होते. पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि पंजाबमध्येही अशा घटना घडल्या आहेत. पंजाबमध्ये तर विषारी दारूने एकाच वेळी ९० जणांचा बळी घेतला होता. काही वर्षापूर्वी मुंबईतही अशी दुर्दैवी घटना घडली होती. विषारी दारूने आजवर देशात शेकडो लोकांचा बळी गेला आहे तरीही त्यातून काही धडा घेतला जात नाही. आताही मुख्यमंत्र्यांनी या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाईचे संकेतही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत ही स्वागतार्ह बाब असली तरी त्यातून काही सध्या होईल असे वाटत नाही. एखादी दुर्दैवी घटना घडली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला की, त्या घटनेची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग नेमला जातो पण त्या चौकशी आयोगाचे पुढे काय होते ? त्यातून दोषींना शिक्षा होते का ? शिक्षा होते तर मग अशा घटनांची पुनरावृत्ती का होते ? हे प्रश्न अनुत्तीर्णच राहतात. मुळात अशा घटना घडूच नयेत यासाठी सरकार काय प्रयत्न करते हे महत्वाचे आहे. विषारी दारू उत्पादन करून ती विकली जात असताना पोलिस आणि प्रशासन काय करत होती हा खरा प्रश्न आहे. दारूची निर्मिती करणारे दारूमध्ये अल्कोहोल, धतुरा आणि युरिया टाकतात. ही दारू बनवण्यासाठी नवसागर आणि मिथेनॉल यासारख्या रसायनांचा देखील वापर केला जातो. हे सर्व पदार्थ मानवी शरीरासाठी हानिकारक आहे हे माहीत असतानाही त्याचा दारुसाठी सर्रास वापर केला जातो. ही दुदैवी घटनाही मिथेनॉलमुळे झाल्याचा प्राथमिक अंदाज न्यायवैद्यक तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. आपल्या देशात विनापरवाना दारू विक्री करणे हा गुन्हा असताना गाव खेड्यातच नव्हे तर शहरातही अवैध दारूच्या भट्ट्या जागोजागी दिसतात. या भट्ट्यांमध्ये अवैध पद्धतीने दारू उत्पादित केली जाते. हे पोलिसांसह प्रशासनाला माहीत देखील असते पण या दारू माफियांनी पोलिसांसह प्रशासनाचेही हात आधीच ओले केले असल्याने ते याकडे कानाडोळा करतात. त्याचा परिणाम म्हणून अशा दुर्दैवी घटना घडतात. एखादी मोठी दुर्दैवी घटना घडली किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दौरा असला तरच कारवाईचे नाटक केले जाते आणि काही दिवसांनी पुनश्च हरीओम होतो. दारू माफिया व पोलिस आणि प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी यांच्या अभद्र युतीमुळेच अशा दुर्दैवी घटना घडतात. जोवर ही भ्रष्ट युती तुटत नाही आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही तोवर अशा घटना थांबतील असे वाटत नाही. या घटनेची देशभर चर्चा झाल्याने पुणे पोलिसांवरील दबाव वाढला त्यामुळे त्यांनी काही लोकांना अटक केली. मात्र ही कारवाई एवढ्यावरच न थांबवता पोलिसांनी यामागील पाळेमुळे शोधून काढली पाहिजे. दारू माफिया कितीही मोठा असला तरी त्याच्यावर कारवाई करण्याची धमक पोलिसांनी दाखवायला हवी. अर्थात दारू पिणारे लोक त्यांच्याकडे येतात म्हणूनच ते दारू विकतात हे ही तितकेच खरे आहे. दारूच्या आहारी गेलेले लोक दारू मिळाली नाही तर जी दारू मिळेल ती पितात. आपण जी दारू पितो तिच्यामुळे आपला जीवही जाऊ शकतो याचेही भान त्यांना नसते दारू माफियांवर कारवाई करण्यासोबतच दारूच्या आहारी गेलेल्या लोकांचे समुपदेशन करून त्यांना व्यसनमुक्त करण्यासाठी देखील शासनस्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत.


**भाड्याने देणे आहे**

**संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी**

**२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे**

- पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन
- वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
- थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध
- व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा

पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर

- संपर्क - 9822258458







# प्रजेच्या हृदयावर राज्य करणारी लोकमाता

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०१ वी जयंती विशेष



मराठा साम्राज्यातील एक महान व आदर्श अशा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आदर्श राणी होत्या. त्यांना त्यांच्या न्यायप्रिय स्वभाव, लोककल्याणकारी काम आणि उत्तम प्रशासनासाठी ओळखले जाते. त्यांचा जन्म दि. ३१ मे १७२५ मध्ये साला, त्यांचे जन्मस्थान मु. चौडीगाव जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र हे होय. त्यांच्या वडिलांचे नांव माणकोजी शिंदे होते. त्यांचे पती खंडेराव होळकर, सासरे मल्हारराव होळकर.

अहिल्यदिवीचे बालपण साधेपणात गेले. मल्हारराव होळकर यांनी त्यांच्यातील गुण ओळखून त्यांचा विवाह आपला मुलगा खंडेराव याच्याशी लावला. राज्यकारभार - पती खंडेराव यांच्या निधनानंतर आणि पुढे मल्हारराव होळकर यांच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवींनी मालवा राज्याचा कारभार सांभाळला. त्यांनी इंदूर व महेश्वर येथून राज्य - कारभार केला. त्या अत्यंत न्यायी व प्रजेला प्रेम करणाऱ्या शासक होत्या. त्याच्या दरबारात सर्वांना समान न्याय मिळत असे.

समाजकार्य आणि बांधकामे : त्यांनी भारतभर अनेक मंदिरे, घाट, विहिरी आणि धर्मशाळा बांधल्या. त्यांनी अनेक धार्मिक स्थळांचा जीर्णोध्दार केला. त्यांनी पुनर्बांधणी केलेली काही प्रसिद्ध ठिकाणे : काशी विश्वनाथ मंदिर, सोमनाथ मंदिर.

विशेष गुण : न्यायप्रिय शासक, धर्मनिरपेक्ष विचार, प्रजेसाठी कल्याणकारी योजना, साधे जीवन आणि उच्च विचार, महिलासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व. आजही त्यांना भारतातील सर्वोत्तम महिला शासकापैकी एक मानले जाते. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात त्यांचा मोठ्या आदराने उल्लेख केला जातो. त्यांनी फक्त राज्यकारभारच केला नाही तर समाजधर्म, व्यापार आणि जनकल्याणासाठी अत्यंत मोठे कार्य केले. त्यांच्या कामामुळे त्यांना 'लोकमाता' असेही म्हटले जाते.

न्यायी आणि लोकाभिमुख प्रशासन -

अहिल्यादेवी रोज स्वतः दरबार भरवत असत. सामान्य लोकांच्या तक्रारी त्या थेट ऐकत आणि तात्काळ न्याय देत. त्यांच्या राज्याल चोरी आणि भ्रष्टाचार कमी होता. शेतकऱ्यांना संरक्षण मिळत होते. गरीब लोकांना मदत केली जात होती. महिलांचा सन्मान राखला जात होता. त्या प्रजेच्या सुखदुःखात सहभागी होत असत.

मंदिरे आणि धार्मिक स्थळांचा जीर्णोध्दार :-

मुघल आक्रमणामुळे अनेक मंदिरे उध्वस्त झाली होती. अहिल्यदिवीनी अनेक प्रसिद्ध मंदिरांची पुनर्बांधणी आणि जीर्णोध्दार केला. घाट, विहीरी, धर्मशाळा - वाटसरूंची तहान भागविण्यासाठी त्यांच्या काळात कोरीव चिरेबंदी पायऱ्यांचे बांधकाम असलेल्या बारव बांधल्या होत्या. त्यातील अकोले तालुक्यातील वीरगाव, कुंभेफळ, वाशेरे येथे त्या बारव आहेत. वाशेरे येथील बारव गावालगत असल्याने ती सतत वापरात आहे. ही होळकर कालीन बारव बंदिस्त केली असून गावची पिण्याच्या पाण्याची तहान भागवते, ती वापरात आहे. प्रवाशासाठी आणि भाविकासाठी त्यांनी घाट बांधले, विहीरी आणि तलाव तयार केले. धर्मशाळा उभारल्या, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली.

व्यापार आणि अर्थव्यवस्था- व्यापार वाढविण्यासाठी सुरक्षित रस्ते तयार केले. व्यापाऱ्यांना संरक्षण दिले करप्रणाली सुलभ केली. त्यामुळे मालवा प्रदेश आर्थिक दृष्ट्या समृध्द झाला.

महेश्वराचा विकास - महेश्वर हे शहर त्यांनी सांस्कृतिक आणि धार्मिक केंद्र म्हणून विकसित केले. महेश्वरमध्ये किल्ले आणि घाट बांधले. विणकाम उद्योगाला प्रोत्साहन दिले, प्रसिध्द महेश्वरी साडी परंपरेला चालना मिळाली. महिलासाठी प्रेरणा - त्या काळात महिलांना फारसे अधिकार नव्हते. तरीही अहिल्यादेवींनी अत्यंत यशस्वीपणे राज्य चालवले. त्यांनी सिद्ध केले की स्त्रिया देखील सक्षम शासक होऊ शकतात.

साधेपणा व धर्मनिरपेक्षता - राणी असूनही त्यांचे जीवन साधे होते. त्या सर्व धर्माचा आदर करीत असत. त्यांनी हिंदू मंदिरासोबतच इतर धर्माच्या लोकांनाही मदत केली. दयाळूपणा व कठोर गुण यांच्या अंगी होते. प्रजेवर मानेसारखे प्रेम करणाऱ्या भारतीय इतिहासात अहिल्यादेवी यांना आदर्श राज्यकर्ती म्हणून ओळखले जाते.

राजमाता जिजाऊनंतर खंबीरपणे राज्यकर्ता म्हणून अहिल्यादेवींनी मराठा साम्राज्यातील एक प्रभावी व मुत्सद्दी म्हणून मुत्सद्दी शासक म्हणून कारभार पारिला, एक महान शासक, पराक्रमी योध्दा आणि माळवा पातांच्या राजमाता अशी ख्याती महाराणी अहिल्यादेवीनी स्वकर्तृत्वाने निर्माण केली. महिला सशक्तीकरणावर त्यांनी विशेष भर दिला. स्त्रीयींसाठी त्यांनी कायद्यात बदल केले. मूल दत्तक घेण्याचा अधिकार, उदर निर्वाहा करता पतीच्या संपत्तीत अधिकार मिळवून दिला. शिवाय दत्तकपत्रावर आकारला जाणारा नजराणा (कर) रद्द केला. खजिन्यातील पैसा हा जनकल्याणासाठी, गोरगरीबासाठी, लेकराबाळाच्या दुध पाण्यासाठी आहे असे त्या म्हणत. राज्यकर्ता म्हणून जनकल्याणाचा विचार त्यांनी कधीही नजरेआड होऊ दिला नाही. अशा थोर राज्यकर्तीचे निधन १३ ऑगस्ट १७९५ रोजी झाले.

थोर राज्यकर्तीस नमन- तीन वर्षात चोंडी राष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ होणार, तीर्थक्षेत्र म्हणून नावरूपास येणार, १५ चोंडी येथील विकास आराखड्यासाठी राज्य सरकारने ६८९ कोटीच्या खर्चास मान्यता दिली आहे चोंडीत होणार आधुनिक संग्रहालय, ओपन एअर थिएटर अन् भव्य पुतळा.


**संकलक– सुभाष बाबुराव थिटे**
**चैतन्यनगर, संगमनेर**
**मोबा. ९२७०३८०८२५**


# फटांगरे यांनी निष्ठा स्पष्ट करावी - काळे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील काँग्रेस विचारसरणीच्या नेतृत्वाने १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध अपक्ष उमेदवार म्हणून लढत दिली होती ही निष्ठा म्हणायची का..? स्वतःला काँग्रेसचे निष्ठावान नेते समजत असतील, तर नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे चिन्ह आणि झेंडा बाजूला ठेवण्यामागचे कारण काँग्रेसचे युवा नेते अजय फटांगरे यांनी जनतेसमोर स्पष्ट करावे.

तसेच काँग्रेस विचारसरणीचे पदवीधर आमदार देखील काँग्रेस विरोधात निवडून आले आहेत. पदवीधर आमदार हे नेमके महाविकास आघाडीचे आहेत की महायुतीचे..? असा सवाल शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश काळे यांनी विचारला आहे.

काँग्रेसचा विचार आणि पक्ष चिन्ह बाजूला ठेवून दुसऱ्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवणे, म्हणजे पक्ष गहाण ठेवण्यासारखेच होते. मग ही पक्षनिष्ठा म्हणायची का..! तसेच हिवरगाव पावसा टोल नाक्यावर गरीब कर्मचाऱ्यांना मारहाण करणाऱ्यांनी आमदार अमोल खताळ पाटील यांच्यावर टीका करण्याचा अजय फटांगरे यांना कुठलाच नैतिक अधिकार नाही असा इशारा रमेश काळे यांनी दिला आहे.


**पाहिजेत**

**आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.**

हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१

संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090



**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846













**पाहिजेत**

होलसेल मेडीकल दुकान कामासाठी मुले पाहिजेत

इंग्रजीचे ज्ञान आवश्यक

आकर्षक पगार

संपर्क- ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
9730042410



**पाहिजेत**

**मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे**

प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753



**CHANGE IN NAME**

I, Aksa Afrojkhan Pathan have changed My Old Name Aksa Afroj Pathan to New Name as Aksa Afrojkhan Pathan Address...... Mogalpura, Raza Chaowk, Sangamner Dist. Ahmednagar (MH) Pin-422605



**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

# मातीच्या ओल्या विटा ते कर्तृत्वाच्या सुवर्णविटा

# सौ. कल्पनाताई शिंदे यांचा जीवन गौरव

## वाढदिवसानिमित्ताने...



आयुष्याच्या वाटेवर चालताना जेव्हा संघर्षाचे डोंगर समोर उभे ठाकतात, तेव्हा काही माणसे कोसळतात, तर काही माणसे त्याच डोंगराच्या शिळांमधून स्वतःच्या कर्तृत्वाचा मार्ग कोरतात. ज्यांच्या हातांनी एकेकाळी पोटाची खळगी भरण्यासाठी मातीच्या ओल्या विटा घडवल्या आज त्याच हातांनी समाजात संस्कारांच्या आणि समाजसेवेच्या सुवर्णविटा रचल्या आहेत. हे नाव म्हणजे संगमनेर नगरपालिकेच्या माजी नगरसेविका सौ. कल्पना सूर्यकांत शिंदे. काही दिवसांपूर्वी पुणे येथे पद्मश्री डॉ. मिलिंद कांबळे यांच्या शुभहस्ते त्यांना 'जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान केवळ एका महिलेचा नसून तो असीम कष्ट, जिद्द आणि मातृत्वाच्या अजेय शक्तीचा गौरव होता. कल्पणाताईचां आज ७१ वाढदिवस आहे त्यानिमित्ताने कल्पना ताईंना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा....

कल्पनाताईंचा जीवनप्रवास हा एखाद्या थरारक कादंबरीसारखा आहे. बालपणातच आई-वडिलांचे छत्र हरवल्यामुळे नियतीने त्यांच्यासमोर अभावाचे आभाळ उभे केले. वडील नाहीत, भाऊ नाही आणि पाठीशी खंबीर असा कोणाचाही आधार नाही, अशा परिस्थितीत त्यांनी आणि त्यांच्या मोठ्या बहिणीने मातीच्या विटा बनवण्याचे कष्टप्रद काम स्वीकारले. चिखलात पाय रोवून उभ्या राहिलेल्या या माउलीने केवळ विटाच घडवल्या नाहीत तर स्वतःचे चारित्र्यही तितक्याच कणखरपणे घडवले. मोठ्या बहिणीच्या मायेच्या सावलीत आणि स्वतःच्या दुर्दम्य इच्छशक्तीच्या जोरावर त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. हाच काळ त्यांच्या आयुष्यातील प्रामाणिकपणा आणि कष्टाच्या मूल्यांची पायाभरणी करणारा ठरला.

विवाहानंतर त्या शिंदे कुटुंबाची सून म्हणून आल्या. सासरे शिंदे बाबा म्हनून ब्राम्हनवाडा पंचक्रोशीतील प्रसिद्ध घराणे. तर पती श्री. सूर्यकांत शिंदे यांचे शिक्षण क्षेत्रातील एक आदर्श शैक्षणिक काम आणि प्रतिभावान नाट्यकर्मी. पती आणि सासरच्या मंडळींच्या प्रोत्साहनामुळे कल्पनाताईंनी प्राथमिक शिक्षिका म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. केवळ पुस्तकी ज्ञान देणे हा त्यांचा उद्देश नव्हता तर गावातील महिलांना साक्षर करणे आणि शेजाऱ्यांना जगण्याची नवी उमेद देणे यात त्या सदैव अग्रभागी असत. मात्र, आयुष्यात पुन्हा एकदा त्यागाची वेळ आली. पतीची बदली संगमनेरला झाली आणि मुलांच्या उच्च शिक्षणाचा प्रश्न समोर उभा राहिला. स्वतःची नोकरी महत्त्वाची की मुलांचे भविष्य? या प्रश्नावर त्यांनी क्षणाचाही विचार न करता स्वतःच्या हक्काच्या नोकरीचा त्याग केला. त्या दिवशी जेव्हा त्या गाव सोडून निघाल्या, तेव्हा संपूर्ण गाव त्यांना निरोप देण्यासाठी स्वयंस्फूर्तीने जमले होते. एका शिक्षिकेला मिळालेली ही पोचपावती त्यांच्या लोकप्रियतेची पहिली साक्ष होती.

संगमनेरमध्ये स्थायिक झाल्यावर त्यांनी संसाराचा गाडा हाकण्यासाठी शिलाई यंत्रावर बॅगा शिवण्याचे काम सुरू केले. त्यांच्या कामातील प्रामाणिकपणा आणि प्रत्येकाशी आपुलकीने वागण्याच्या स्वभावामुळे त्या अल्पावधीतच लोकप्रिय झाल्या. लोकांच्या आग्रहाखातर त्यांनी राजकारणात पाऊल ठेवले. विश्वास असा असावा की मागण्याची गरज पडू नये, आणि नेतृत्व असे असावे ज्याला योग्य माणसाची पारख असावी!

सौ. कल्पनाताई शिंदे यांचा थोरात आणि तांबे परिवाराच्या नेतृत्वावर असणारा अढळ आत्मविश्वास आणि निष्ठा खऱ्या अर्थाने फळाला आली. संगमनेर नगरपालिकेच्या निवडणुकीत कोणतीही मागणी न करता, केवळ त्यांच्या प्रामाणिक कामाची पोचपावती म्हणून नेतृत्वाने त्यांना उमेदवारी जाहीर केली. हा सन्मान केवळ एका उमेदवारीचा नाव्हता तर लोकनेते बाळासाहेब थोरात आणि आदरणीय डॉ. सुधीर तांबे यांनी एका सच्च्या कार्यकर्त्याच्या पाठीवर टाकलेला विश्वासाचा हात होता. मिळालेल्या या संधीचे सोने करून, संगमनेरच्या विकासात आणि थोरात-तांबे परिवाराच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी कल्पनाताई निश्चितच यशस्वी घोडदौड केली, यात शंका नाही! आणि संगमनेरच्या जनतेने त्यांना प्रचंड मताधिक्याने नगरसेविका म्हणून निवडून दिले.

२००१ ते २००५ या कालखंडात त्यांनी केलेले कार्य आजही आदर्श मानले जाते: आपल्या प्रभागात रस्ते, पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापनाचे जाळे विणून त्यांनी नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवल्या. कल्पणाताईनीं शेकडो महिलांना बचत गटांच्या माध्यमातून संघटित करून त्यांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग दाखवला. महिला-बालकल्याण आणि आरोग्य समितीच्या सभापती म्हणून त्यांनी शाळांचे नूतनीकरण आणि महिलांच्या आरोग्यासाठी विशेष उपक्रम राबवले.

कल्पनाताईंनी आपल्या कष्टाच्या घामातून केवळ मालमत्ता नाही, तर मुलांच्या रूपाने 'माणुसकीची रत्ने' कमावली. आईचे कष्ट पाहूनच त्यांचे सुपुत्र डॉ. मंगेश शिंदे (पुणे) यांच्या मनात समाजसेवेचे बीज रुजले. आईने दिलेली शिकवण आणि वडिलांचे संस्कार यांतूनच **'MGNESA Group'** सारखे एक मोठे साम्राज्य उभे राहिले आहे.

त्यांचा मोठा मुलगा आणि सून पुण्यात उच्च पदावर कार्यरत आहेत. धाकटा मुलगा समीर आणि कन्या अर्चना यांनी वडिलांचा वारसा जपत शिक्षण क्षेत्रात स्वतःला झोकून दिले आहे.तीनही सुनाना लेकी समान मानतात.आज हे संपूर्ण कुटुंब सुशिक्षित आणि सुसंस्कृत म्हणून समाजात आदराने ओळखले जाते, याचे सर्व श्रेय कल्पनाताईंच्या त्यागाला जाते.

पुण्यातील दिमाखदार सोहळ्यात पद्मश्री डॉ. मिलिंद कांबळे यांच्या हस्ते जेव्हा त्यांना 'जीवनगौरव' प्रदान करण्यात आला, तेव्हा तो क्षण संपूर्ण शिंदे कुटुंबासाठी आणि माझ्या सह संगमनेरकरांसाठी अभिमानाचा ठरला. पती सूर्यकांत शिंदे यांच्या साथीने, मुलांच्या पाठिंब्याने आणि जनसामान्यांच्या आशीर्वादाने कल्पनाताईंचा हा प्रवास आजही अखंड सुरू आहे.

मातीच्या विटा घडवणारी मुलगी ते एक यशस्वी लोकप्रतिनिधी आणि आदर्श माता हा त्यांचा प्रवास येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखा मार्गदर्शक ठरेल. त्यांच्या या झळाळत्या कर्तृत्वाला आणि निस्वार्थ सेवेला समस्त समाजाचा मानाचा मुजरा!आजचा दिवस आपल्या सर्वांसाठी अत्यंत ऐतिहासिक आणि आनंदाचा आहे. माजी नगरसेविका आदरणीय सौ. कल्पनाताई शिंदे यांच्या आयुष्यातील दोन सुवर्णक्षण आज एकत्र आले आहेत. ताई आज वयाची ७१ वर्षे पूर्ण करत असून, आयुष्यातील प्रत्येक चढ-उतारात एकमेकांना खंबीर साथ देत, सौ. कल्पनाताई आणि सूर्यकांत शिंदे सर यांनी आपल्या सहजीवनाची ५० सुवर्ण वर्षे पूर्ण केली आहेत. परस्पर प्रेम आणि आदराचे हे नाते पुढील अनेक वर्षे असेच बहरत राहो,

हा दुहेरी योग साजरा करण्यासाठी आज त्यांचा संपूर्ण परिवार मुले, सुना आणि नातवंडे एकत्र आले आहेत. ज्यांच्या विचारांना आणि कार्याला आपण आदर्श मानतो, अशा ज्येष्ठ व श्रेष्ठ व्यक्तींच्या म्हणजेच नामदार बाळासाहेब थोरात साहेब, माजी आमदार डॉ सुधीर तांबे साहेब, माजी नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे, व आमदार सत्यजित तांबे.नगरअध्यक्ष सौ मैथिलीताई तांबे यांच्या शुभहस्ते ताईंचा यथोचित सन्मान करण्याचा संकल्प परिवाराने केला आहे. माजी नगरसेविका कल्पनाताई शिंदे आणि सूर्यकांत शिंदे परिवाराशी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आदरणीय बाळासाहेब थोरात साहेब आणि आमदार डॉ. सुधीर तांबे साहेब यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे व स्नेहाचे संबंध आहेत.हा भव्य कृतज्ञता सोहळा आज 'मालपाणी हेल्थ क्लब, संगमनेर' च्या प्रांगणात मित्रपरिवारात अत्यंत उत्साहात साजरा होत आहे. ताईंना उदंड आणि सुदृढ आयुष्याच्या अनंत शुभेच्छा! वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा....



**डॉ नामदेव गुंजाळ**
**संगमनेर**

# वडझरी बुद्रुकमध्ये ग्रामस्थांचे आमरण उपोषण सुरू



### खाण व क्रशरविरोधात ग्रामस्थांचा एल्गार

**प्रमुख मागण्या -**

**बेकायदेशीर खाणकाम व स्टोन क्रेशर तात्काळ बंद करावेत.**
**ब्लास्टिंगमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी.**
**बाधित पाणी स्रोत पूर्ववत करून नागरिकांना दिलासा द्यावा.**
**पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.**
**संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करावी.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील वडझरी बुद्रुक परिसरात सुरू असलेल्या खाणकाम, स्फोटक ब्लास्टिंग आणि स्टोन क्रेशरच्या वाढत्या दहशतीविरोधात ग्रामस्थांनी अखेर निर्णायक लढ्याचा मार्ग स्वीकारला असून आजपासून आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे. शेतकरी, महिला, युवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या मोठ्या उपस्थितीत सुरू झालेल्या या आंदोलनामुळे परिसरातील वातावरण चांगलेच तापले आहे.

ग्रामस्थांच्या आरोपानुसार, गावालगत सुरू असलेल्या खाणकामामुळे शेती, पिण्याचे पाणी, घरे आणि पर्यावरण यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. सततच्या ब्लास्टिंगमुळे अनेक घरांना तडे गेले असून विहिरी व बोअरवेलच्या पाणीपातळीवर गंभीर परिणाम झाला आहे. क्रेशरमधून उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

या संदर्भात महसूल विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित प्रशासनाकडे वारंवार तक्रारी, निवेदने आणि पुरावे सादर करूनही प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. चौकशीचे आदेश दिले गेले, अधिकारी भेटी देऊन गेले; मात्र प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही बदल झाला नसल्याने ग्रामस्थांचा संताप उफाळून आला आहे.

आता आरपारची लढाई अशी भूमिका घेत ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचा निर्णय घेतला असून मागण्या मान्य झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा ठाम इशारा दिला आहे.

उपोषणस्थळी विविध सामाजिक संघटना, शेतकरी संघटना आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहत असून आंदोलनाला दिवसेंदिवस व्यापक पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे प्रशासनासमोर आता मोठे आव्हान उभे राहिले आहे. तक्रारी, निवेदने, चौकशीचे आदेश आणि वाढता जनआक्रोश यानंतरही कारवाई का होत नाही? खाण व क्रेशर चालकांना नेमके कुणाचे अभय आहे? प्रशासनाची भूमिका संशयास्पद का वाटते? असे थेट प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केले जात आहेत.

वडझरी बुद्रुकचा हा संघर्ष आता केवळ एका गावापुरता मर्यादित राहिलेला नाही. पर्यावरण संरक्षण, शेतीचे अस्तित्व, जलस्रोतांचे संवर्धन आणि ग्रामीण जनतेच्या हक्कांसाठीचा हा लढा बनला असून प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# अकोलेत पशुवैद्यकीय दवाखान्यात चोरी

## ४० हजारांचे सोलर इन्व्हर्टर आणि बॅटऱ्या लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील तिरडे येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी २ च्या इमारतीचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. चोरट्याने दवाखान्यातील अंदाजे ४० हजार रुपये एकूण किमतीचे सोलरचलित इन्व्हर्टर आणि सोलरच्या ४ बॅटऱ्या लबाडीच्या इराद्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, फिर्यादी अशोक मोहन भोंडे (वय ४८ वर्षे, रा. तिरडे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर; मूळ रा. धनगरवाडी, वाकडी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) हे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी २, तिरडे येथे कार्यरत आहेत. दिनांक २१ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून ते दिनांक २२ मे २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजेच्या दरम्यान ही घरफोडी झाली. अज्ञात चोरट्याने दवाखान्याच्या समोरील गेटचे कुलूप तोडून आत

प्रवेश केला आणि कपाटात तसेच दवाखान्यात ठेवलेले इंट्राटेक/युटीसी कंपनीचे सोलर चलित इन्व्हर्टर व ५ वर्षांपूर्वीच्या सोलर चलित इन्व्हर्टरच्या ४ बॅटऱ्या स्वतःच्या फायद्याकरिता चोरून नेल्या. याप्रकरणी अशोक भोंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३५१/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कायदा, २०२३ चे कलम ३०५ (अ) आणि ३३१ (४) प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बोरसे आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल खाडे यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अंमलदार पोलीस हेड कॉन्स्टेबल खाडे करत आहेत.

# विधानपरिषद निवडणुकीत भाजप आघाडीवर

मुंबई - स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाकडून ११ नावांची यादी जाहीर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपाध्यक्ष नितीन नबीन आणि इतरही वरिष्ठ नेत्यांबरोबर चर्चा केल्यानंतर रविवारी रात्री भाजपने उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली. या यादीमध्ये काही नावांवर चांगलीच चर्चा सुरू झाली आहे. भाजपात इतर पक्षातून प्रवेश केलेल्या उमेदवारांना देखील संधी देण्यात आली आहे. एका उमेदवाराला पक्ष प्रवेशाच्या अवघ्या २४ वर्षात प्रवेश दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

विधान परिषदेच्या १७ जागांपैकी ११ जागांवर भाजप, ४ जागा शिवसेना शिंदे गटाला तर दोन जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस लढणार आहे. महायुतीत जागावाटपावरून प्रचंड रस्सीखेच सुरू होती. भाजपने जाहीर केलेल्या यादीवरून कोणत्या जागा कोणत्या पक्षाकडे गेल्याचे आता स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादीकडून रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि पुणे विधान परिषदेची जागा लढवण्यात येणार आहे.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता-
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस
सुसज्ज ऑपरेशन थिएटर
सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे
अत्याधुनिक लॅब
अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13






# दैनिक युवावार्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता






















## धर्म कार्यात राजकारण नको ...

पान १ वरून - भूमिपूजन सोहळ्याच्या फलकांवर 'हभप किसन महाराज हारदे शिष्य मंडळ' आयोजक असल्याचा उल्लेख करण्यात आला होता. यावर आक्षेप घेत, असा कोणताही कार्यक्रम शिष्य मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला नाही. या फलकांद्वारे जनतेची दिशाभूल केली जात असून हा कार्यक्रम बेकायदेशीर आहे, अशी भूमिका घेत काही जणांनी जिल्हाधिकाऱ्यांसह प्रशासनाला निवेदन दिले होते. तसेच परिसरात काळे झेंडे. व निषेधाचे फलक लावून आंदोलन करण्याचा इशारा दिल्याने परिसरात कमालीचा तणाव निर्माण झाला होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शनिवारी दुपारी शहर पोलीस ठाण्यात एक तातडीची बैठक बोलवण्यात आली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे आणि पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या उपस्थितीत सोहळ्याचे आयोजक आणि विरोध दर्शविणारे स्थानिक ग्रामस्थ यांच्यात चर्चा झाली. मात्र, दोन्ही बाजू आपापल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने या बैठकीत कोणताही तोडगा निघू शकला नाही.

बैठकीत तोडगा न निघाल्याने आणि महंत रामगिरी महाराज यांच्या उपस्थितीमुळे पोलिसांनी मंदिर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी आंदोलनकर्त्यांनी परिसरात लावलेले काळे झेंडे आणि निषेधाचे फलक काढून घेतले. सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास श्रीक्षेत्र सराला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांचे कार्यक्रमस्थळी आगमन झाले. त्यांच्या उपस्थितीत आणि पोलिसांच्या कडक निगराणीखाली हा समाधी मंदिर भूमिपूजन सोहळा अखेर शांततेत पार पडला. मात्र, या घटनेमुळे गुंजाळवाडी आणि आश्रम परिसरात अजूनही अंतर्गत वाद व तणावाचे वातावरण कायम आहे.

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा,
नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25